दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १६६ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार, दि.२० एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro, Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (चोकेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# आमच्यातील वाद अन् भांडण महाराष्ट्र व मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी फार किरकोळ

## राज ठाकरेंची उद्धव ठाकरेंशी युतीची तयारी

**मुंबई (वृत्तसंस्था): राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र येणार का? हा अवघ्या महाराष्ट्राला पडलेला प्रश्न आहे. यापूर्वी राज यांनी स्वत:हून पुढे येत उद्धव ठाकरे यांना टाळी देण्याचा प्रयत्न केला. पण उद्धव यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. आता मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा उद्धव यांच्यासोबत युती करण्याचे सकारात्मक संकेत दिलेत. 'महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी आमच्यातील वाद, भांडणे व इतर गोष्टी फार क्षुल्लक आहेत. त्यामुळे एकत्र येणे व एकत्र राहणे यात फार काही कठीण गोष्ट आहे असे मला वाटत नाही,' असे ते म्हणालेत.**

राज ठाकरे यांनी अभिनेते व दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या वॅको सॅनिटी या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी विविध मुद्यांवर परखड भाष्य केले. यावेळी महेश मांजरेकर यांनी त्यांना एकेठिकाणी उद्धव ठाकरे यांच्यासोबत युती करण्याचा प्रश्न केला. त्यावर राज यांनी अत्यंत सकारात्मक उत्तर दिले. ते म्हणाले, 'प्रश्न असा आहे की, कोणत्याही मोठ्या गोष्टीसाठी आमच्यातील वाद आमच्यातील भांडणे हे अत्यंत किरकोळ आहेत. महाराष्ट्र खूप मोठा आहे. या महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी ही भांडणे, वाद व इतर गोष्टी फार क्षुल्लक आहेत. अत्यंत क्षुल्लक आहेत. राज ठाकरे यांनी यावेळी मनसे आणि भाजप एकत्र येणे गरजेचे आहे का? या प्रश्नावरही भाष्य केले. ते म्हणाले, 'मी जे महाराष्ट्राविषयी किंवा मराठी माणसासाठी बोलू शकतो, करू शकतो, ज्या प्रकारचा सापळा तोडू शकतो. भाजपसोबत मी बरोबर येणे हे राजकीय होईल. परंतु सगळ्याच वेव्हलेंथ आमच्या जुळतील



असे नाही. पण आता राजकारणात कोणत्या गोष्टी केव्हा घडतील हे काही सांगता येत नाही. उद्या आमच्याशी शेकहँडही केला जाईल. किंवा समोरासमोर येऊन हात जोडलेही जातील. कल्पना नाही. राजकारणात सर्वच गोष्टी बदलत असतात. आता तर इथे सर्वच गोष्टींना एवढा वेग आला आहे की, त्यात कधी कोणती गोष्ट होईल सांगता येत नाही.'

### मी आयत्या पिठावर रेघोट्या मारत नाही

महेश मांजरेकर यांनी यावेळी राज यांना एकत्र येणे शक्य नसेल तर तुम्ही शिंदे सेना अर्थात शिवसेना टेकओव्हर करण्यास हरकत नव्हती असा प्रश्न केला. त्यावर राज ठाकरे यांनी आपल्या खास शैलीत उत्तर दिले. 'मी आयत्या पिठावर रेघोट्या मारत नाही. पहिली गोष्ट अशी आहे की, शिंदेंचे बाहेर जाणे किंवा आमदार फुटणे हा राजकारणाचा एक वेगळा भाग झाला. मी शिवसेनेतून बाहेर पडलो तेव्हा अनेक आमदार, खासदार माझ्याकडे आले होते. मला त्याचवेळी हे शक्य होते. पण माझ्या मनात एकच गोष्ट होती की, मी बाळासाहेब सोडले तर मी कुणाच्याही हाताखाली काम करणार नाही. त्यावेळची परिस्थिती अशी होती.परंतु, मी शिवसेनेत होतो तेव्हा मला उद्धव सोबत काम करण्यास काहीही हरकत नव्हती. पण समोरच्याची इच्छा आहे का मी त्याच्याबरोबर काम करावे, असे ते म्हणाले. त्यावर मांजरेकर यांनी अशी महाराष्ट्राची इच्छा असल्याचे सांगितले. त्यावर पुन्हा राज ठाकरे यांनी त्यांनी तसे महाराष्ट्राला सांगावे. मी अशा छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये माझा इगो केव्हाच आणत नाही,' असे राज ठाकरे म्हणाले.

### हा माझ्या एकट्याच्या इच्छेचा प्रश्न नाही

त्यामुळे एकत्र येणे व एकत्र राहणे यात फार काही कठीण गोष्ट आहे असे मला वाटत नाही. पण प्रश्न फक्त इच्छेचा आहे. हा माझ्या काही एकट्याच्या इच्छेचा किंवा स्वार्थाचा विषय नाही. मला वाटते आपण महाराष्ट्राचा लार्जर पिक्चर पाहिला पाहिजे. महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्षांमधील मराठी लोकांनी एकत्र येऊन एक पक्ष स्थापन केले पाहिजे असे मला वाटते.'

## गडचिरोलीत नक्षलविरोधी यशस्वी कारवाई!

# ७७ गुन्ह्यांचा मास्टरमाइंड 'रघु' पत्नी समवेत अडकल्याने चळवळीला जबर हादरा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पल्ली जंगल परिसरात गडचिरोली पोलीस व सीआरपीएफच्या संयुक्त कारवाईत १९ एप्रिल रोजी चार जहाल माओवादींना अटक करण्यात यश आले. यामध्ये दोन डिव्हीसीएम पदावरील माओवादींचा समावेश असून, त्यांच्या अटकेमुळे नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला आहे. महाराष्ट्र शासनाने या चौघांवर एकूण ४० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.




भामरागड उपविभागातील ताडगाव पोस्टे हद्दीतील जंगल परिसरात माओवाद्यांच्या हालचाली लक्षात घेऊन सुरक्षा दलांनी ही कारवाई केली. संशयित हालचाली पाहून चार जणांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी आपली ओळख सायलु भूमय्या मुड्डेला उर्फ रघु उर्फ प्रताप (५५, डिव्हीसीएम, दक्षिण गडचिरोली डिव्हिजन), जैनी भिमा खराटम उर्फ अखीला उर्फ रामे (४१, डिव्हीसीएम, भामरागड दलम व सचिव, भामरागड एरिया कमिटी), झाशी दोघे तलांडी उर्फ गंगु (३०, सदस्य, भामरागड दलम) आणि मनिला पिडो गावडे उर्फ सरिता (२१, सदस्य, भामरागड दलम) अशी दिली. चौघेही विविध गंभीर गुन्ह्यांत गुंतलेले असून, त्यांच्या अटकेपूर्वी त्यांनी पोलीस जवानांच्या हत्या, चकमक आणि घातपाताच्या घटनांमध्ये सहभाग घेतल्याचे निष्पन्न झाले आहे.

सायलू भूमय्या हा तेलंगणा राज्यातील लिंगापूर येथील असून १९९० पासून माओवादी चळवळीत सक्रिय आहे. २०२४ पासून तो दक्षिण गडचिरोली विभागीय समितीच्या सचिव पदावर कार्यरत होता. त्याच्यावर एकूण ७७ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३४ चकमक, २३ खून, ७ जाळपोळ व १३ इतर गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे. त्याची पत्नी जैनी भिमा ही छत्तीसगड राज्यातील कंचाला येथील असून, ती २००१ पासून चळवळीत आहे. २०२१ पासून ती डिव्हीसीएम पदावर असून भामरागड एरिया कमिटीची सचिव म्हणून कार्यरत होती. तिच्यावर २९ गुन्हे दाखल असून त्यात १८ चकमक, ४ खून, ३ जाळपोळ व इतर गुन्हे आहेत.

या कारवाईमुळे गडचिरोली जिल्ह्याच्या दक्षिण भागातील माओवादी चळवळीला मोठा धक्का बसला आहे. झाशी तलांडी ही भामरागड तालुक्यातील येचली येथील असून तिच्यावर १४ गुन्हे, तर मनिला गावडे ही अहेरी तालुक्यातील कपेवंचा येथील असून तिच्यावर १० गुन्हे दाखल आहेत. दोघींनाही भामरागड दलमच्या सक्रिय सदस्य म्हणून ओळखले जाते.

या कारवाईमुळे गडचिरोली जिल्ह्यात २०२२ पासून आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या माओवाद्यांची संख्या ९६ वर पोहोचली आहे. पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशस्वी मोहीम पार पडली. त्यांनी या कारवाईचा उल्लेख करत नक्षलवाद्यांना हिंसेचा मार्ग सोडून आत्मसमर्पण करण्याचे आवाहन केले आहे.

# आम्ही तुमचा बाप चोरला नाही, हृदयात ठेवला

## एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरे यांच्यावर हल्ला



**मुंबई । विराम पवार**

शिवसेनेतील 'बाप' वाद आता तणावपूर्ण वळणावर पोहोचला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्या गटात बापावरून जोरदार वाद सुरू झाला आहे. शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर देत, जे बापाचे झाले नाहीत, ते जनतेचे काय होणार? असा सडेतोड सवाल केला आहे.

शिंदे म्हणाले, आम्ही तुमचा बाप चोरला नाही, तर त्याला हृदयात ठेवला आहे. तो आम्हाला कायम पूजनीय आहे. ठाकरे गटाने बाळासाहेब ठाकरेंच्या नावावरून शिंदे गटावर हल्ला केला होता. यावर शिंदे यांनी ठाकरे यांना प्रत्युत्तर देत, तुम्ही पाप झाकण्यासाठी बाळासाहेबांचा आवाज चोरला, अशी घणाघाती टीका केली.

उद्धव ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी नाशिकच्या शिबिरात बोलताना, मला कोणाचा बाप चोरण्याची गरज नाही, असे म्हटले होते. यावर शिंदे गटाने जोरदार प्रत्युत्तर दिले असून बाळासाहेब ठाकरेंचा एक जुन्या व्हिडिओद्वारे काँग्रेस संदर्भातले वक्तव्य दाखवले आहे.

आज दोन्ही शिवसेनेत 'बाप' मुद्द्यावरून चांगला राजकीय वाद निर्माण झाला आहे, ज्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत आणखी चुरस निर्माण होऊ शकते.

# वाट बघा, दोघेही एकत्र आले तर आम्हाला आनंदच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (वृत्तसंस्था):** शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती होण्याची शक्यता वर्तवली जात आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या



अस्तित्वासाठी ही भांडणे, वाद या गोष्टी अत्यंत क्षुल्लक आहेत. एकत्र येणे, एकत्र राहणे, यात कठीण गोष्ट आहे, असे मला वाटत नाही. पण विषय फक्त इच्छेचा आहे, असे विधान उद्धव ठाकरेंसोबत युती करण्याच्या मुद्द्यावर केले होते. यावर उद्धव ठाकरेंनी देखील मी सुद्धा भांडण बाजूला ठेवायला तयार आहे, असे वक्तव्य केले आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बघा जर दोघेही एकत्र आले तर आम्हाला आनंदच आहे. कोणीही आपल्यातले मतभेद विसरून एकत्र येत असतील तर यात वाईट वाटायचे कारण नाही. फक्त मला वाटते की माध्यमे त्यावर जास्त विचार करत आहेत. त्यामुळे वाट बघा. ते एकत्र आले तर उत्तम आहे. आम्ही स्वागत करू, असे फडणवीस म्हणाले आहेत.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य युतीवर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली असल्याचे दिसले. एकनाथ शिंदे सध्या त्यांच्या गावी दरेगाव येथे आहेत. यावेळी त्यांना दोघांचे युतीवर प्रश्न विचारण्यात आला. हा प्रश्न ऐकताच एकनाथ शिंदे भडकल्याचे दिसले. काय रे तू म्हणत त्यांनी माईक दूर केला आणि प्रश्नाचे उत्तर न देताच निघून गेले आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदे यांची नाराजी स्पष्ट दिसून आली आहे. काही दिवसांपूर्वीच एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरेंचे घरी जाऊन त्यांची भेट घेतली होती.

## देऊळगाव धान घोटाळा प्रकरणात दोन आरोपी अटकेत

# गडचिरोली पोलिसांची कारवाई जवळपास चार कोटींचा अपहार उघड

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यातील देऊळगाव येथील धान खरेदी केंद्रात तब्बल ३ कोटी ९६ लाख ६५ हजार ९६५ रुपयांचा अपहार झाल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी गडचिरोली पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेंद्र वाघ व त्यांच्या पथकाने केली.



शासनाच्या आधारभूत किंमत योजनेअंतर्गत आदिवासी सहकारी संस्था मर्या., आरमोरीच्या माध्यमातून २०२३-२४ व २०२४-२५ या हंगामांत देऊळगाव येथे धान खरेदी करण्यात आली. मात्र चौकशीदरम्यान खरेदी व साठवणूक यामधील मोठी तफावत आढळली. २०२३-२४ मध्ये खरेदी केलेल्या १९,८६०.४० क्विंटल धानाच्या तुलनेत प्रत्यक्षात ३,९४४.०८ क्विंटल धानाचा अपहार होऊन १ कोटी ५३ लाख ९३ हजार ९८० रुपयांचा नुकसान झाल्याचे समोर आले. तर २०२४-२५ मध्ये १७,२६२.४० क्विंटल खरेदी केलेल्या धानाच्या तुलनेत ६,१४० क्विंटल धानाचा अपहार होऊन २ कोटी ४२ लाख ७२ हजार ८८५ रुपयांचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी कुरखेडा पोलीस ठाण्यात उपप्रादेशिक व्यवस्थापक मुरलीधर बावणे यांच्या तक्रारीवरून संस्था सचिव महेंद्र मेश्राम यांच्यासह संचालक मंडळातील १३ सदस्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी याप्रकरणी आदिवासी सहकारी संस्था मर्या., आरमोरी येथे कार्यरत असलेले ग्रेडर चंद्रकांत ज्ञानेश्वर कासारकर (वय ३९, रा. यवतमाळ) आणि विपणन निरीक्षक हितेश व्ही. पेंदाम (वय ३५, रा. आरमोरी) यांना अटक केली आहे. आज(१९ एप्रिल) आरोपींना कुरखेडा न्यायालयात हजर करण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे.

# हळदीच्या कार्यक्रमात रंगला राग! महिलेसह मुलाला बेदम मारहाण

## तुला सोडणार नाही म्हणत जीवे मारण्याची धमकी

**शिरूर**–शांतीनगर परिसरात हळदीच्या आनंदावर वादाच्या रागाने पाणी फेरले! किरकोळ कारणावरून सुरू झालेल्या वादात तिघांनी महिलेसह तिच्या अल्पवयीन मुलाला बेदम मारहाण करत रस्त्यावरच गोंधळ घातल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे या झटापटीत आरोपींनी तुला सोडणार नाही, जिवंत ठेवणार नाही अशी उघड धमकीही दिली.

दिक्षा मोहन राखपसरे (वय ३०, रा. शांतीनगर, शिरूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक १८ एप्रिल रोजी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास त्यांनी आणि त्यांच्या सासूबाईंनी मुलगा श्रेयश व प्रकाश विठ्ठल लोंढे यांच्यात झालेल्या वादाबाबत स्पष्टीकरण विचारण्यासाठी प्रकाशच्या घरी भेट दिली. मात्र, चर्चा करण्याऐवजी गंगा विठ्ठल लोंढे, प्रकाश विठ्ठल लोंढे आणि कैलास विठ्ठल लोंढे या तिघांनी अचानक हल्ला चढवला.फिर्यादी दिक्षा व सासू लिलाबाई राखपसरे यांना हाताने, लाथाबुक्यांनी मारहाण करण्यात आली, तर श्रेयशवर काठीने हल्ला करत त्याला शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. एकाच कुटुंबातील तिघांकडून केलेली ही हिंसक कृती परिसरात खळबळजनक ठरली आहे.या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, इछड कलम ११५ (२), ११८(१), ३५२, ३५१(२)(३), ३(५) अंतर्गत कारवाई सुरू आहे. प्रकरणाचा तपास पो.ह. ३३२८ खेडकर करीत आहेत.

# खासदार शरद पवार यांची शिंदेवाडीतील श्री श्री लक्ष्मी तरु ऑक्सिजन पार्कला भेट

## कॅन्सरवर प्रभावी असलेल्या औषधी वृक्षाबाबत माहिती घेतली

**शिरूर । रमेश बनसोडे**

देशाचे ज्येष्ठ नेते आणि पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांनी शिंदेवाडी (ता. हवेली, जि. पुणे) येथील आर्ट ऑफ लिविंग आणि शाश्वत विकास फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या श्री श्री लक्ष्मी तरु ऑक्सिजन पार्कला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी कॅन्सरवर प्रभावी ठरणाऱ्या लक्ष्मी तरु या औषधी वृक्षाबाबत सविस्तर माहिती घेतली.सुमारे वीस मिनिटे शरद पवार यांनी लक्ष्मी तरुच्या उपयोगांविषयी सखोल चर्चा केली. कॅन्सर, डायबिटीज, चिकनगुनिया, डेंगू, मलेरिया अशा विविध आजारांवरील उपचारामध्ये या झाडाचा उपयोग कसा होतो, याची माहिती त्यांनी घेतली. झाडाच्या फळाची चव अनुभवताना त्यापासून मिळणाऱ्या तेल, औषधी घटक, खत व ऑक्सिजन निर्मितीविषयीचे गुणधर्म त्यांनी जाणून घेतले. लक्ष्मी तरुचे आयुष्य ७० वर्षे असून, याची उंची ५० फूटपर्यंत जाते. प्रत्येक झाडापासून दरवर्षी १०० किलो फळांचे उत्पादन मिळते, जे साधारण १५ ते २० हजार रुपयांचे उत्पन्न देते. लक्ष्मी तरुच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवा पर्याय उपलब्ध होऊ शकतो. या झाडांपासून औषधी तेल, आयुर्वेदिक औषधे, खत यांचे उत्पादन होऊन गाव स्तरावर उद्योगांची शक्यता निर्माण होऊ शकते. शरदचंद्र पवार यांनी गावामध्ये फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी स्थापून उत्पादन प्रक्रिया केल्यास शिंदेवाडी हे गाव देशभरात आदर्श ठरेल, असे मत व्यक्त केले. श्री प्रभाकर जगताप यांनी यासंदर्भात संपूर्ण प्रकल्प, त्यातील शेतीची पद्धत, वापरण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती पवार साहेबांना दिली.शिंदेवाडीमध्ये गायरान व डोंगर भागांवर मोठ्या प्रमाणात लक्ष्मी तरु वृक्ष लागवड करण्यात आली आहे. देशात आतापर्यंत आर्ट ऑफ लिविंग व प्रभाकर जगताप यांच्या पुढाकारातून २१ लाख लक्ष्मी तरु झाडे लावण्यात आली आहेत, त्यातील सर्वात मोठा प्रकल्प शिंदेवाडी येथे आहे.

या भेटीदरम्यान पवार यांनी आपल्यासोबत पूर्वी कार्यरत असलेला कार्यकर्ता आज वृक्ष लागवड व पर्यावरणसेवा करत असल्याचे पाहून अभिमान व्यक्त केला. कार्यकर्त्यांचा असा सकारात्मक प्रवास समाजासाठी प्रेरणादायी आहे, असेही त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमाला वडगाव शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे, माजी आमदार जगन्नाथ शेवाळे, माजी आमदार अशोक पवार, हवेली तालुक्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष संदीप बापू गोते पाटील, तसेच अनेक मान्यवर व स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी लक्ष्मी तरु वृक्षांचे प्रत्यक्ष रोपण देखील करण्यात आले.हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी तसेच पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने भविष्यातील एक आदर्श आणि स्वयंपूर्ण मॉडेल ठरणार आहे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



# अलिबाग एसटी आगारातील खड्ड्यांमुळे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात, प्रशासन मौन!

**रायगड । प्रतिनिधी**

अलिबाग हे रायगड जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असून, येथील एसटी आगारातून हजारो प्रवासी दररोज विविध मार्गांवर प्रवास करत आहेत. मात्र, या एसटी आगारातील दुरवस्था आता गंभीर रूप धारण करत आहे. आगारात मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत आणि या खड्ड्यांमुळे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात आली आहे. यावर प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे.




अलिबाग एसटी आगारात सध्या मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे बस आणि इतर वाहने खड्ड्यांमध्ये आदळत असल्याने टायर आणि स्प्रिंग्सचे नुकसान होण्याचा धोका वाढला आहे. यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः, एसटी बस चालवताना चालकांसमोर अचानक आलेले खड्डे वाहतुकीचा मोठा अडथळा निर्माण करतात. यावर प्रवाशांकडून वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत, पण प्रशासनाकडून याबाबत कोणतीही दखल घेतली जात नाही.अलिबाग एसटी आगारातून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसह दैनंदिन प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मुरुड, रोहा, पनवेल, कर्जत, शिर्डी, मुंबई, ठाणे आणि बोरीवली अशा प्रमुख मार्गांवर दररोज एसटी बसांची वर्दळ असते. एसटी आगारानेही यावर लक्ष देऊन विना थांबा पनवेल फेरीसारखी सेवाही सुरू केली आहे, ज्याला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. मात्र, स्थानकाच्या दुरवस्थेबाबत प्रवाशांमध्ये नाराजीची भावना आहे.आगाराच्या दुरवस्थेत अनेक ठिकाणी अस्थाव्यस्थ कचरा पडलेला असतो, ज्यामुळे स्थानकाची स्वच्छता देखील कमी झाली आहे. यावर मोकाट कुत्र्यांचा वावर वाढल्याने प्रवाशांची सुरक्षा आणखी धोक्यात येत आहे. कचऱ्यामुळे अनेक आजारांचीही शक्यता निर्माण झाली आहे. एसटी आगाराचे काँक्रीटीकरण करण्यात आले होते, परंतु काही वर्षांपासून खड्डे पडले आहेत, ज्यामुळे बस आणि इतर वाहने खड्ड्यांमध्ये आदळत आहेत.

अलिबाग एसटी आगाराच्या दुरवस्थेवर प्रशासनाकडून बारंबार तक्रारींच्या नोंदी करण्यात आलेल्या असून, खड्डे भरण्याची मागणीही केली गेली आहे. परंतु, यावर प्रशासनाकडून अद्यापही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. स्थानकाच्या दुरवस्थेमुळे एसटी प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे प्रवाशांमध्ये असंतोष वाढत आहे.प्रवाशांचा अपघात होण्याच्या आधीच प्रशासनाने तातडीने खड्ड्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. स्थानकाच्या इतर समस्या देखील त्वरेने सोडवण्यात याव्यात. आलिबाग एसटी आगाराची दुरवस्था आणि खड्ड्यांचा प्रश्न त्वरित सोडवला जावा अशी प्रवाशांची अपेक्षा आहे.

## देवी दाक्षायणी मातेच्या यात्रेस प्रारंभ

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील लासुरगाव येथे १८ एप्रिल रोजी दाक्षायणी मातेच्या यात्रेला प्रारंभ झाला. शिवना नदीच्या काठावर वसलेल्या दाक्षायणी देवीच्या भव्य मंदिरात दरवर्षी लाखो भाविकांचे दर्शन घेतले जाते. लासुर गावातील या मंदिरात असलेल्या देवीला ग्रामदैवत आणि तालुक्याचं आराध्य दैवत मानलं जातं.

दाक्षायणी देवीची मूर्ती आकर्षक आहे. चांदीच्या टोप्या, अंगभर दागिन्यांनी सजलेली, प्रसन्न मुद्रेत असलेली देवी भक्तांना आकर्षित करणारी आहे. देवीचे पीठ लासुर गावातच आहे, म्हणूनच देशभरातील भाविक देवीच्या दर्शनासाठी येथे गर्दी करतात.

दाक्षायणी देवीच्या लासुर गावात प्रकट होण्याची एक दिलचस्प आख्यायिका आहे. तिच्या आई-वडिलांकडून अपमान झाल्यानंतर तिने पुत्रकामेष्टी यज्ञात उडी घेतली. त्यानंतर शंकराने जटा आपटून तांडव केलं आणि देवी पुन्हा लासुर गावी प्रकटली. मंदिराच्या बांधकामात हेमाडपंथी शैलीचा प्रभाव आहे, आणि त्याचं रुप कालांतराने बदललं आहे. मंदिराच्या सादरीकरणात असलेल्या सुदंर नक्षीकामाने भक्तांना एक वेगळी प्रसन्नता अनुभवायला मिळते. मंदिराच्या कळसावर एक मुख्य कळस आणि तीन उपकळस आहेत. देवीच्या मूर्तीच्या समोर असलेली वाघाची मूर्ती,




एका अखंड दगडी शिळेत कोरलेली, भक्तांचे लक्ष वेधून घेते. याशिवाय मंदिराच्या रस्त्यावर इतर धार्मिक साहित्यांची दुकानं आहेत, जिथे भाविक विविध अर्पण वस्त्रं, फुलांच्या मण्यांचे आणि इतर सामग्री विकत घेतात.

लासुरगावात वर्षातून दोन वेळा मोठा उत्सव साजरा केला जातो. एप्रिल-मे महिन्यात एक मोठा यात्रा उत्सव, तसेच नवरात्रीत नऊ दिवस भक्तांनी मंदिर गजबजलेलं असतं. नववधूंसाठी दाक्षायणी मातेचा आशीर्वाद घेणं ही एक प्रथा बनली आहे, ज्यामुळे विवाह समारंभात देवीचा आशीर्वाद घेणं शुभ मानलं जातं.देवीच्या मूर्तीच्या समोर असलेली वाघाची मूर्ती आणि कासवाची मूर्ती मंदिराच्या वेगळेपणाचं द्योतक आहे. यज्ञाच्या अंगारामुळे भाविकांच्या नवसाला पूर्णता मिळवते, आणि म्हणूनच हे मंदिर नेहमीच भक्तांनी भरलेलं असतं.

## नागपूर महा मेट्रोमध्ये सिकलसेल रुग्णांसाठी जॉबची मागणी-नव्या जीवनाची संधी!

**नागपूर । प्रतिनिधी**

सिकलसेल रुग्णांच्या जीवनात असंख्य आव्हाने असतात. त्यांना शारीरिक कष्ट सहन करण्यासोबतच आर्थिक दृष्टीनेही संघर्ष करावा लागतो. परंतु आता, नागपूर महा मेट्रोमध्ये त्यांना एक अनोखी संधी मिळविण्याची मागणी जोर धरत आहे. सिकलसेल रुग्णांना तिकीट काउंटर सारख्या ऑफिस कामांमध्ये नोकरी मिळावी अशी विनंती करण्यात आली आहे. तेव्हा विचार करा, ८ तासांची सहज कार्यालयीन नोकरी म्हणजे सिकलसेल रुग्णांसाठी एक मोठी संधी होईल. त्यांच्या उपचारांसाठी लागणारा खर्च, त्यांचे आरोग्य आणि आर्थिक गरजा या सर्व गोष्टींमध्ये या नोकरीमुळे मोठा बदल होईल. त्यांना केवळ ५०० ते ६०० रुपये मिळतात, ज्यामुळे त्यांचा जीवनस्तर सुधारावा, असं या मागणी करणाऱ्यांचं म्हणणं आहे.सिकलसेल रुग्णांना सहकार्य करण्याचा आणि त्यांना स्थिर रोजगार देण्याचा विचार आता




मोठ्या आवाजात केला जात आहे. हे जॉब मिळाले तर, त्यांचं आयुष्य बदलू शकतं असा विश्वास व्यक्त करणारे अनेक कार्यकर्ते आणि समाजसेवी व्यक्तिमत्त्वं या मागणीसाठी एकत्र आले आहेत.

# जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांना निवेदन

**सोलापूर । प्रतिनिधी**

१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, तसेच शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत त्वरित निर्णय घ्यावा, या मागणीसाठी आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांना निवेदन देण्यात आले.

राजस्थान, छत्तीसगढ, झारखंड व हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये जुनी पेन्शन योजना पुन्हा सुरू करण्यात आली आहे. कर्नाटकमध्येही यासंदर्भात प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्रातही ही योजना लागू व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना गेल्या सात वर्षांपासून सातत्याने प्रयत्नशील आहे. आतापर्यंत विविध आंदोलने, मोर्चे आणि उपक्रमांद्वारे ही मागणी सरकारपुढे मांडण्यात आली आहे.

राज्यातील सुमारे पाच लाख कर्मचाऱ्यांना याचा थेट लाभ होणार असून त्यांच्या निवृत्तीनंतरचे जीवन सुरक्षित होईल, असे संघटनेचे म्हणणे आहे. महाराष्ट्र सरकारने यापूर्वी अनेक कर्मचारीहिताचे निर्णय घेतले असून, जुनी पेन्शन योजना देखील त्याच धर्तीवर लागू करावी, अशी संघटनेची विनंती आहे.या निवेदनप्रसंगी सोलापूर जिल्हा पेन्शन संघटनेचे जिल्हा नेते तात्यासाहेब जाधव, अजित कणसे, सुधीर माने आणि दत्तात्रय जाधव उपस्थित होते.



## परभणीत वंचित बहुजन आघाडीने काढला शांतता मार्च

# सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देणार-सुजात आंबेडकर

**परभणी (वा.) । प्रतिनिधी**

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी वंचित बहुजन आघाडी संघर्ष करत आहे. एकीकडे बाळासाहेब आंबेडकर न्यायालयात लढा देत आहेत, तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर उतरून सरकारवर दबाव टाकत आहे. तथापि, सरकार अजूनही या गंभीर मुद्याबाबत मौन साधून आहे. न्याय मिळविल्याशिवाय हा लढा थांबणार नाही, असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी दिला.सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना न्याय मिळावा, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीतर्फे १९ एप्रिल २०२५ रोजी संध्याकाळी परभणीत शांतता मार्च काढला गेला. शनिवार बाजार येथून सुरू झालेल्या या मोर्चाने छत्रपती शिवाजी महाराज चौक, गांधी पार्क मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पोहोचले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाले, जिथे सुजात आंबेडकर यांनी संबोधित




केले. यावेळी सोमनाथ सूर्यवंशी यांची आई विजयाबाई आणि भाऊ प्रेमनाथ हे देखील उपस्थित होते.याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी राज्य उपाध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ, राज्य प्रशिक्षक प्रा. डॉ. सुरेश शेळके, जिल्हाध्यक्ष सुनील मगरे, तुकाराम भारती, महिला जिल्हाध्यक्ष सुनीता साळवे, शहराध्यक्ष प्रमोद कुटे, तुषार गायकवाड, रणजीत मकरंद, गणेश गाढे, शिधोधन सावंत आणि भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाचे कार्यकर्ते देखील उपस्थित होते.

सुदर्शन आणि बाळासाहेब आंबेडकर यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी शांतता मार्च काढला आहे. आंबेडकर म्हणाले, 'सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबासाठी न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरले आणि पोलिसांच्या क्रूरतेचा सामना केला. सोमनाथच्या मरणानंतर, जिल्हाधिकारी आणि मुख्यमंत्री यांनी सभागृहात खोटे विधान केले होते, पण डॉक्टर आणि वकिलांच्या प्रामाणिक कामामुळे घटनांची सत्यता सर्वांसमोर आली, आणि प्रशासनाच्या खोट्या वक्तव्यांचा पर्दाफाश झाला.'

सोमनाथ सूर्यवंशीला न्याय मिळवण्याच्या नावाखाली अनेक पक्षांचे नेते परभणीत येऊन गेले, पण त्यांचे सहानुभूतीचे वचन खोटे सिद्ध झाले. काहींनी परभणीतून लाँग मार्च काढला, पण तो मुंबईत पोहोचला नाही. आंबेडकर यांनी यावर टीका केली.आंबेडकर कुटुंब आणि वंचित बहुजन आघाडी नेहमीच सोमनाथच्या कुटुंबासोबत आहे. आम्ही न्याय मिळवून देण्यासाठी कायम संघर्ष करत राहू, असा निर्धार श्री. सुजात आंबेडकर यांनी व्यक्त केला.

### पोलिस प्रशासनाकडून सोमनाथचा खून-विजयाबाई सूर्यवंशी

**सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई यांनी सभेत आपली भावना व्यक्त करताना म्हटले, 'पोलिसांनी माझ्या मुलाला मारहाण केली आणि त्याचा मृत्यू झाला. पोलिस प्रशासनाने माझ्या मुलाचा खून केला आहे, आणि त्या पोलिसांना कठोर शिक्षा दिली पाहिजे. मला बाळासाहेब आंबेडकरवर विश्वास आहे, तेच मला न्याय मिळवून देतील.'सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबीयांसाठी वंचित बहुजन आघाडीचा लढा कायम राहील, आणि त्यांना न्याय मिळवून देण्याची वचनबद्धता कायम राखली जाईल.**

# आय.सी.यु.ची सुविधा उपलब्ध करून देतो, यात डॉक्टर मंडळींनी पुढाकार घ्यावा-आ.डॉ.रत्नाकर गुट्टे यांचे आव्हान

**गंगाखेड । प्रतिनिधी**

शहर व तालुक्यातील गंभीर आजाराच्या रुग्णांना रात्रीच्या काळात उपचार सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे अनेकांचे प्राण गेले आहेत. रात्रीची उपचार सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. गंगाखेडमधील उपजिल्हा रुग्णालयात वीस खाटा असलेली आय.सी.यु. सुविधा साहित्य उपलब्ध करून दिली जात आहे. त्या संदर्भात शहरातील सर्व डॉक्टर मंडळींनी सहकार्य करावे, असे आवाहन आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी केले.

सुमन फंक्शन हॉलमध्ये (दि. १८ एप्रिल) व्यापारी महासंघ गंगाखेड आणि लायन्स क्लब गंगाखेड टाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर असोसिएशन आणि आडत असोसिएशनच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आमदार रत्नाकर गुट्टे होते. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर डॉक्टर असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. के. पी. गारुळे, कोषाध्यक्ष डॉ. किशोर कुगणे, आडत असोसिएशनचे निर्वाचित अध्यक्ष गोविंद रामराव जाधव, सचिव अरुण उर्फ गोलू आष्टुरकर, उपाध्यक्ष गोविंद गोरे, तुकाराम काकडे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दगडू सोमानी, लायन्स क्लबचे अध्यक्ष गोविंद निरस उपस्थित होते.कार्यक्रमात नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा व्यापारी महासंघ आणि लायन्स क्लबच्या वतीने आ. डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. के. पी. गारुळे यांनी डॉक्टर असोसिएशनच्या विविध आरोग्य सुविधा व शिबिरे आयोजित करण्याचा संकल्प केला. डॉ. किशोर कुगणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



पुढे बोलताना आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे म्हणाले की, 'गंगाखेड नगरपरिषदेची सत्ता माझ्या हातात नसताना, मी कोट्यावधी रुपयांचा निधी नगरपरिषदेस आणून दिला. भविष्यातील पन्नास वर्षांच्या पाणीपुरवठा योजनेसाठी, नगरपरिषदेस सुसज्ज दोन मजली इमारत, उपजिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आणि त्यांचे निवासस्थान, तहसील कार्यालय, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, सुसज्ज नाट्यगृह, गोदावरी काठाचे शुशोभिकरण आणि अनेक अन्य विकास योजनांसाठी निधी मंजूर करून दिला आहे.'त्यांनी सांगितले की, 'नवीन बस स्थानक आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह लवकरच पूर्ण होईल. शहरातील विविध रस्त्यांसाठी कोट्यावधी रुपये आणून बरेचसे कामे पूर्ण केली आहेत. छोटी मोठी राहिलेली कामे नगरपरिषदेच्या निवडणुकीपूर्वी पूर्ण केली जातील. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दगडू सोमानी, ज्ञानेश्वर राजूरकर, सचिन दहिवाळ, माऊली शिंदे, बालासाहेब पारवे, जगन्नाथ आंधळे, बालाजी महाजन, विलास मंगरूळकर, मार्केट कमिटीचे संचालक प्रमोद आप्पा धुळे, विजयकुमार शर्मा, लायन्स क्लब गंगाखेड टाऊनच्या वतीने कॅबिनेट ऑफिसर केशव देशमुख, संभाजी वाडेवाले, प्रा. डॉ. राजीव आहेरकर, संजय तापडिया, महादेव गीते, प्राचार्य बालाजी ढाकणे, गोविंदराव निरस, रामेश्वर तापडिया, डॉ. एम. बी. मानकर, डॉ. धुमाळ, दर्लिंग भूसनर, संजय धुळे, नाथराव चाटे, प्रतापसिंग ठाकूर, विजयआप्पा सावरगावकर, संजय दुधाटे, पाठक, काळे आदींने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कॅबिनेट ऑफिसर केशव देशमुख यांनी केले, प्रास्ताविक डॉ. एम. बी. मानकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन संभाजी वाडेवाले यांनी मानले.

# खापरी/शिवणगाव उच्च प्राथमिक शाळेत चावडी वाचनाचा उत्स्फूर्त कार्यक्रम

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

तालुक्यातील खापरी/शिवणगाव उच्च प्राथमिक शाळेत निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत चावडी वाचन व गणन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचन आणि गणन कौशल्य वाढविणे हा होता.



इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध पद्धतींनी वाचन कौशल्य आत्मसात केले असून, त्यांच्या वाचनाचे प्रदर्शन गावकऱ्यांसमोर करण्यात आले. पालक, ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने वाचन केले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजयभाऊ जयस्वाल होते. यांच्यासह उपसरपंच सुरेश गव्हाळे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष बबनराव पिंपळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप जुनघरे, आणि मुख्याध्यापक संजय देवळीकर यांची उपस्थिती लाभली.मुख्याध्यापक संजय देवळीकर यांनी निपुण महाराष्ट्र अभियान विषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप विजयभाऊ जयस्वाल यांनी केला. सूत्रसंचालन गजानन झाडे सर यांनी तर आभार प्रदर्शन प्रभाकर सोर यांनी केले.यावेळी शिक्षक दामोदर बोकडे, सामाजिक कार्यकर्ते पंकज दुधबडे, नरेश वैद्य, नरेश सयाम, मंगेश मेंढे, रोकेश वासकर, शुभम उके, दिपक जुनघरे, सुधीर वैद्य, तसेच ग्रामस्थ आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एस.एस.एन.जे.महाविद्यालयाचे एनसीसी छात्र सैनिक यशस्वी-'बी' प्रमाणपत्र परीक्षेत प्राविण्य

**देवळी । प्रतिनिधी**

२१ महाराष्ट्र एनसीसी बटालियन अंतर्गत येणाऱ्या स्थानिक एस. एस. एन. जे. महाविद्यालयातील १२ एनसीसी छात्रसैनिकांनी दोन वर्षीय 'बी' प्रमाणपत्र परीक्षेत प्राविण्य मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. सदर परीक्षेत महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागलेला असून, त्यामध्ये १० छात्रसैनिकांनी 'अ' श्रेणीमध्ये, तर २ छात्रसैनिकांनी 'ब' श्रेणीमध्ये यश मिळवले आहे.




या यशस्वी छात्रसैनिकांचा एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये सार्जंट सौरभ साव, सार्जंट मयुरी पेटकर, सार्जंट रितेश बुटे, सुजल पराते, निशांत शितळे, पायल चौके, अनुश्री खंडरे, कल्याणी लिखार, समीक्षा नेवारे, कोमल चितळे, सत्येश्वरी सावरकर आणि नयन तुमसरे या छात्रसैनिकांचा समावेश आहे.छात्रसैनिकांच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण असून, एनसीसी विभागाचे आणि मार्गदर्शकांचे विशेष कौतुक होत आहे. अशा प्रकारच्या यशामुळे युवकांमध्ये देशसेवा, शिस्त व आत्मविश्वास यांचे मोलाचे संस्कार रूजत आहेत.

# कारखान्याच्या अधिकाऱ्याची एक कोटी रुपयांची ऑनलाईन फसवणूक

## सायबर पोलिसांची कारवाई सुरू

**धाराशिव । प्रतिनिधी**

धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील साखर कारखान्याच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याशी ऑनलाईन फसवणुकीचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका अज्ञात व्यक्तीने धाराशिव साखर कारखान्याच्या अध्यक्षाचे छायाचित्र वापरून एका अधिकारी कडून एक कोटी १० लाख रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू केला आहे.



धाराशिव साखर कारखान्याचे अध्यक्ष अमर पाटील यांच्या छायाचित्राचा वापर करून एका व्यक्तीने कारखान्याच्या अधिकारी बाबासाहेब कचरू वाडेकर यांच्याशी मोबाइलवर संपर्क साधला. वाडेकर यांच्याशी संवाद साधताना त्या व्यक्तीने खुद्द अमर पाटील असल्याचा दावा केला आणि बँक खात्यावर एक कोटी १० लाख रुपये ट्रान्सफर करण्याची मागणी केली. त्यासाठी एक बँक खाते क्रमांक दिला आणि पैसे पाठविण्याचे सांगितले.

वाडेकर यांना प्रथम शंका आली आणि त्यानंतर त्यांनी तपास सुरू केला. मात्र, पैसे ट्रान्सफर झाल्यानंतर वाडेकर यांना त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आले आणि त्यांनी गुरुवारी धाराशिव सायबर पोलिस ठाण्यात तक्रार केली.

तक्रारीनुसार, संदिग्ध व्यक्तीने वाडेकर यांच्याशी १५ एप्रिल रोजी सकाळी सात वाजता संपर्क साधला आणि त्याला पुढे दुसऱ्या दिवशी १७ एप्रिल रोजी मध्यरात्री पुन्हा कॉल केला. या कालावधीत त्या व्यक्तीने अमर पाटील यांच्या छायाचित्राचा वापर करून स्वत:ला पाटील असल्याचे सांगितले आणि वाडेकर यांना एक कोटी १० लाख रुपयांची रक्कम एका बँक खात्यावर ट्रान्सफर करण्यास सांगितले. या सगळ्या घटनेनंतर वाडेकर यांनी शक्यतो तपास सुरू केला आणि सायबर पोलिस ठाण्यात तक्रार केली.

वाडेकर यांच्या तक्रारीवर सायबर पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला आहे. पोलिसांनी तांत्रिक सहाय्य घेत आरोपीचा शोध सुरू केला आहे. आरोपीने साखर कारखान्याच्या अधिकाऱ्याच्या विश्वासाला धोका दिला असून, बँक खात्याच्या तपासावरून आरोपीचा मागोवा घेण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे. या प्रकारामुळे सायबर सुरक्षेच्या महत्त्वावर प्रकाश पडतो. ऑनलाईन फसवणूक आणि सायबर क्राइम्स वाढत असताना, लोकांना अधिक सजग राहण्याची आवश्यकता आहे. अशा फसवणुकीपासून वाचण्यासाठी बँक खात्यांची गोपनीयता, क्यूआर कोड स्कॅनिंग, अनोळखीनंबरवरून येणारे कॉल आणि ईमेल्ससाठी सजग असणे आवश्यक आहे. सायबर पोलिसांनी आपल्या तपासात तात्काळ कारवाई सुरू केली असून, आरोपीला लवकरच अटक होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे सायबर क्राइम आणि ऑनलाईन फसवणुकीसाठी नागरिकांना अधिक जागरूक होण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. तसेच, या घटनेनंतर पोलिसांनी संबंधित विभागांना इतर सायबर क्राइम घटनांमध्ये अधिक सक्रिय राहण्याचे निर्देश दिले आहेत.

# उन्हाळ्यात पाणपोई उभारून मानवतेचे उदाहरण सादर करणारा पुलगाव येथील बडीये परिवार



**पुलगाव । प्रतिनिधी**

प्रखर उन्हाळ्यात जनसामान्यांना शीतल पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने पुलगाव येथील बडीये परिवार गेल्या अनेक वर्षांपासून सतत पाणपोई उभारून समाजसेवेचे अत्युत्तम उदाहरण सादर करत आहे. राष्ट्रसंत दादाजी धुनीवाले यांचे निष्ठावान सेवक श्री. मदन बडीये (दादाकृपा प्रोव्हिजन्स) यांनी आपल्या स्व. आई-वडिलांच्या स्मरणार्थ उन्हाळ्याच्या दिवसांत मोफत थंड पाण्याची व्यवस्था केली आहे.

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे गरजू व सर्वसामान्य नागरिकांना महागडे बाटलीबंद पाणी घेणे शक्य होत नाही. अशा वेळी कुणाचाही जीव तहानेने धोक्यात येऊ नये, या भावनेतून 'जल ही जीवन आहे' या तत्त्वाला अनुसरून बडीये परिवाराने सामाजिक बांधिलकी जपत पाणपोई उपक्रम राबवला आहे.या उपक्रमांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक, फुटाणा लाईन, पुलगाव येथे स्व. शांताबाई अमृतराव बडीये यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पाणपोईचे उद्घाटन सौ. श्वेता बमनोटे यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी डॉ. जीवन तांबेकर, प्रशांत डफळे, काशीप्रसाद पतलिया, बबलू मोकाती, दिलीप चंदन, रजनीकांत पटेल, पंकज पडधारिया, गजानन सिरस्कार, बाबुशेठ पोकळे, मिठाईलाल गुप्ता, दिलीप काकडे, सुरेश सिरस्कार, प्रमोद खेरडे, सूरज दोडके, सुभाष डोंगरे, सुभाषराव दाभाडे, रवींद्र पांडे तसेच संपूर्ण बडीये परिवार उपस्थित होता.या उपक्रमातून बडीये परिवाराने दाखवलेली सेवा वृत्ती आणि सामाजिक जाणीव समाजासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरत आहे. अशा कार्यातून समाजात मानवता, आपुलकी आणि सेवाभाव वृद्धिंगत होत आहे.

# वानरविहीरा येथे घरावर सशस्त्र हल्ला, गुंडप्रवृतीचे तरुणांनी अल्पवयीन तरुणीचे केले अपहरण

## हल्ल्यात आई वडील गंभीर जखमी; गावात दहशतीचे वातावरण; शनिवारी मध्यरात्रीची घटना; गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांचे मतदारसंघातील घटना

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

तालुक्यातील हिंगणी लगतच्या वानरविहीरा येथे सहा सात गुंडप्रवृतीचे तरूणांनी तलवार, चाकू, लोखंडी राँडसह घरावर हल्ला चढवून घरातील लोकांना मारहाण करीत अल्पवयीन तरुणीचे अपहरण केले. ही घटना शुक्रवारी (दि. १९) चे मध्यरात्री २ वाजताचे सुमारास घडली. या घटनेत आपला जीव वाचवण्याचे प्रयत्नात मुलीचे आई वडील गंभीर जखमी झालेत. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली असून गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच नागरीकासह त्वरित पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने सेवाग्राम रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वानरविहीरा येथील मारोती लक्ष्मण देशमुख वय ५०, व सौ अरूणा मारोती देशमुख वय ४५ अशी जखमीची नावे आहेत.



वानरविहीरा येथील मारोती देशमुख हे आपल्या कुटुंबियांसह झोपी गेले असताना शनिवारी मध्यरात्री २ वाजताचे सुमारास एक चारचाकी वाहन तथा दोन दुचाकी वाहनाने तिथे आलेल्या गुंडप्रवृतीच्या सहा ते सात तरूणांनी तलवार, चाकू, तथा लोखंडी राँडने देशमुख यांचे घरावर हल्ला केला. यात घराचे दार तथा खिडकी तोडून घरात शिरण्याचा प्रयत्न केला. यामुळे भयभीत झालेल्या या कुटुबिंयानी त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचेवर तलवारीने वार करीत घरातील साहित्याची नासधूस करुन मुलीस फरफटत नेत वाहनाचे माध्यमातून तेथून पळ काढला. यावेळी या तरूणांचे टोळक्याने आजूबाजूला असलेल्या घराचे दार बाहेरून बंद करून ठेवले होते. दार तोडण्याचा जोरात आवाज ऐकून लगतच्या एकाने बाहेर निघण्याचा प्रयत्न केला असता, त्याचे फाटकावर तलवार आपटली हा सर्व प्रकार ज्यांनी पाहला ते कुटुंब आजही दहशतीत आहे. घटनास्थळी रक्ताचे डाग तथा दगड विटा सब्बल इतर साहित्य पडून होते. यात जखमी झालेल्या दोंघांचे डोक्याला व हाताला गंभीर दुखापत झाली आहे. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून घटनास्थळी फाँरेन्सीक विभागाचे चमूला येथे पाचारण करण्यात आले होते. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंद केला असून पोलीस आरोपीचा शोध घेत आहे. यासाठी संपूर्ण पोलीस यंत्रणा कामाला लागली असून लवकरच आरोपींच्या मुसक्या आवळल्या जातील असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सुकळी स्टेशन येथील वैभव थुल याने तिन महिन्यापूर्वी यशवंत महाविद्यालयात ११ वी सायन्सला असलेल्या याच अल्पवयीन मुलीस पळवून नेले होते. याबाबत पोलीसात तक्रार दाखल केल्यानंतर त्याचेवर गुन्हा नोंदविला गेला आहे. याच गुन्ह्यात तो पोस्को दाखल झाल्याने कारागृहात होता. एक महिन्यापूर्वी जामीनवर त्याची सुटका झाल्याची माहिती आहे. त्याने आपल्यावर झालेल्या कारवाईचा वचपा काढण्यासाठी परत हे कारस्थान केले असून घरावर सशस्त्र हल्ला करीत परत मुलीचे अपहरण केल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. आज मुली रस्त्यावरच नाही तर गावात घरात सुरक्षीत नाही हे या घटनेवरून दिसून येते. आई वडीलावर तलवार, चाकूने हल्ला चढवीत त्यांचे समक्ष तरूण मुलीला फरफटत नेत तिचे अपहरण करणे आणि आई वडिलांनी मदतीसाठी हंबरडा फोडणे हे दृश्य एखाद्या चित्रपटात नव्हे तर प्रत्यक्ष घडलेली घटना आहे. यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही. माझ्या मुलीला वाचवा तिला मारून टाकेल असा टाहो या मुलीची आई फोडत होती. हे कुटुंब आजही प्रचंड दहशतीत असल्याचे दिसून येत होते. प्रथम या मुलीला पळवून नेल्यानंतर यातील आरोपीकडून माझे जिवित्वास धोका आहे असा जवाब या मुलीने नोंदवीला होता. तसेच या मुलाची गुन्हेगारी पार्श्वभूमी पाहता या मुलीचे आईने न्यायालयात त्याचे पासून आमचे कुटुबिंयास धोका असल्याचे सांगत जमानत देण्यात येऊ नये तसा अर्जही दाखल केला होता. तरीही त्याला जामीन मिळाला. यामुळे पोलिसांचे कार्यप्रणाली बाबत येथे प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे.पोलीस यंत्रणा आणि कायदा अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या मुसक्या आवळण्यासाठी कमी पडत असल्याचे या घटनेवरून दिसून येते. अशा लोकांना कायद्याची भिती राहीली नसून गुन्हेगारांचे मनोबल वाढले आहे. यातील आरोपी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून त्याचेवर दारूचे तसेचे हाणामारीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे. या लोकांना कुणांचे पाठबळ आहे. हा संशोधनाचा विषय बनला आहे. पोलीसांशी याचे असलेले लागेबांधे यास कारणीभुत असल्याचे बोलल्या जात आहे. आज मुली घरात सुरक्षित नाही याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. शासनाने याची गांभीर्याने दखल घेत अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना ठेचून कठोर काढण्याची गरज आहे.

# पाणी टाकी न सुरू झाल्यास रस्त्यावर उतरू! छोटूभाई शेख यांचा प्रशासनाला इशारा

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोऱ्याच्या पाणी पुरवठ्याच्या समस्या पुन्हा एकदा उफाळल्या आहेत. शहरातील ७०,००० नागरिकांना हक्काचे पाणी मिळावे यासाठी वरोऱ्याचे माजी सभापती आणि समाजसेवक छोटूभाई शेख यांनी प्रशासनाला ठणकावले आहे. त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, ७ दिवसांच्या आत नवीन पाणी टाकी सुरू न केली, तर ते रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील.

शेख यांचे म्हणणे आहे की, अनेक वर्षांपासून शहरात पाणी पुरवठ्याच्या समस्येचा सामना नागरिकांना करावा लागतो आहे. उन्हाळ्याच्या महिन्यात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होते आणि प्रशासनाकडून यावर कुठलीही ठोस उपाययोजना केली जात नाही. त्यामुळे नागरिकांना दूषित आणि क्लोराईडयुक्त पाणी पिण्याची वेळ येते आहे. त्यावर आता छोटूभाई शेख यांनी आवाज उठवला आहे.नागरिकांचे हक्क कसे हिरावले जात आहेत, यावर प्रशासन लक्ष देत नाही. पाणी टाकीचे काम कधी पूर्ण होईल, हे प्रशासनाच्या वतीने सांगितले जात नाही. मी आधीच प्रशासनाला वेळ दिला होता. आता, ७ दिवसांच्या आत पाणी टाकी सुरू केली नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू, असा इशारा शेख यांनी प्रशासनाला दिला आहे.

याच संदर्भात, शेख यांनी वरोऱ्याच्या मुख्याधिकारी शेळके यांच्याशी फोनवर संपर्क साधला होता. त्यांनी याविषयी जलद कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. तथापि, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या कामाची प्रगती न झाल्यामुळे शेख यांचा राग अनावर झाला आहे. कधी तरी येईल असं आश्वासन नको, आम्हाला त्वरित परिणाम पाहिजे, असे शेख यांनी सांगितले.वरोऱ्याच्या पाणी पुरवठ्याचा मुद्दा मोठा आहे. अनेक वेळा त्यावर ठोस कार्यवाहीची अपेक्षा नागरिकांकडून केली जात आहे. शेख यांनी असेही स्पष्ट केले की, पाणी पुरवठ्याच्या प्रलंबित समस्यांमुळे नागरिकांची स्थिती दिवसेंदिवस बिकट बनत आहे. जर यावर लवकरच उपाय योजना केली नाही तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, असा इशारा त्यांनी दिला आहे.

वरोऱ्याचे पाणी टाकीचे काम असलेल्या ठेकेदार आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे शेख यांनी त्यांच्या आंदोलनाची तयारी सुरू केली आहे. त्यांच्या समर्थकांनीही त्यांना पूर्णपणे पाठिंबा दिला आहे. यामुळे वरोऱ्यातील या पाणी पुरवठ्याच्या समस्येवर लवकर कार्यवाही होण्याची आशा आहे.सामाजिक कार्यकर्त्यांनी या लढ्यात छोटूभाई शेख यांना सहकार्याची ग्वाही दिली असून, रस्त्यावर उतरून आंदोलनाची तयारी केली आहे. शेख यांनी प्रशासनाकडून मागणी केली आहे की, ७ दिवसांच्या आत पाणी टाकी सुरू केली जावी, अन्यथा त्या ठिकाणी मोठे जन आंदोलन करण्यात येईल.



# टाकळी ढोकेश्वर गटातून राष्ट्रवादीच्या संघटन विस्ताराला गती; सभासद नोंदणी अभियानाला उत्साहात प्रारंभ

**पारनेर । प्रतिनिधी**

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सभासद नोंदणी अभियानाची सुरुवात जोशात आणि जनतेच्या मोठ्या प्रतिसादात झाली. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या सूचनेनुसार, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांच्या पुढाकाराने आणि आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाला स्थानिक पातळीवर नवी ऊर्जा मिळाली आहे.



गावागावांतून होत असलेल्या सभासद नोंदणीमुळे पक्षाची संघटना नव्याने बळकट होणार असून कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य संचारले आहे. भोंद्रे, काकणेवाडी, तिखोल, ढोकी आणि टाकळी ढोकेश्वर या गावांमध्ये झालेल्या सभांमध्ये आमदार दाते यांच्या अध्यक्षतेखाली नोंदणी मोहिमेला प्रारंभ झाला.या वेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवक तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.कार्यक्रमात बोलताना नेत्यांनी सभासद नोंदणीचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, या अभियानाच्या माध्यमातून पक्ष जनतेच्या अधिक जवळ पोहोचेल आणि ग्रामीण पातळीवर नव्या नेतृत्वाला संधी मिळेल. कार्यकर्त्यांनी देखील गावागावात फिरून अधिकाधिक सभासद जोडण्याचा निर्धार केला.

तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी सांगितले की, या अभियानातून केवळ सदस्यसंख्या वाढणार नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेची पाळंमुळं अधिक खोलवर रुजतील.या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी स्थानिक कार्यकर्ते एकदिलाने काम करत असून, पुढील काही दिवसांत तालुक्यातील इतर गटांतही ही मोहीम अधिक तीव्रतेने राबवली जाणार आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी नेहमी सजग असलेल्या पक्षाच्या या अभियानामुळे नवा उत्साह, नवा आत्मविश्वास आणि नवसंघटन निर्माण होत असल्याचे चित्र तालुक्यात स्पष्टपणे दिसत आहे.

# जमिनीतून उसळली धगधग; शिरूर तालुक्यात हाणामारी;पाच जणांवर गुन्हा

**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर तालुक्यातील रांजणगाव सांडस येथे जमिनीच्या वादातून उफाळून आलेल्या हाणामारीमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणात शिरूर पोलिसांनी पाच जणांविरुद्ध नवीन भारतीय दंड संहितेनुसार (इछड) गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले आहेत.

प्रशांत सुरेश रणदिवे (वय ३४, रा. रांजणगाव सांडस) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक २५८/२०२५ अन्वये दशरथ गुलाबराव शितोळे, तानाजी बाळासो शितोळे, संभाजी दशरथ शितोळे, नंदकुमार बाळासो शितोळे आणि बाळासो गुलाबराव शितोळे या पाच जणांविरुद्ध इछड कलम १८९(२), १९१(२), १९०, ११८(२), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दि. १८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजता प्रशांत रणदिवे आणि त्यांचे वडील सुरेश रणदिवे हे आपल्या गट क्रमांक १०५/१ मधील शेतजमिनीवर जात असताना तीन मोटारसायकलवरून आरोपी आले. त्यांनी हा रस्ता तुमच्या बापाचा नाही असे म्हणत शिवीगाळ आणि दमदाटी करत रणदिवे पिता-पुत्रांना हाताने व लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली.यात संभाजी शितोळेने लाकडी काठीने प्रशांत यांच्या गुडघ्यावर, नाकावर व छातीवर तर वडिलांच्या पोटावर व पाठीत मारहाण केली. झटापटीत प्रशांत यांची आई सुमन रणदिवे व चुलते मधुकर रणदिवे यांनी मधस्थीचा प्रयत्न केला असता त्यांनाही काठीने जबर मारहाण झाली.प्रकरण गंभीर वळणावर जात असतानाच आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून पुन्हा एकदा रणदिवे कुटुंबाला जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.या तक्रारीवरून पो.ह.वा. शिंदे यांनी गुन्हा नोंदवला असून या प्रकरणाचा तपास स.फो. बनकर करत आहेत. पोलिसांनी घटनास्थळी गस्त वाढवली असून पुढील कारवाईसाठी तयारी सुरू केली आहे.

### जीपीएस आधारित टोल प्रणालीसाठी ऐतिहासिक पाऊल

# १ मे २०२५ पासून भारतात नवीन युगाची सुरुवात

**शिरूर । रमेश बनसोडे**

भारत सरकारच्या वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे, जो देशातील महामार्ग वाहतुकीच्या पद्धतीत क्रांतिकारी बदल घडवणार आहे. १ मे २०२५ पासून भारतातील राष्ट्रीय महामार्गांवर पारंपरिक फास्टॅग (FaSTag) प्रणाली बंद करून जीपीएस आधारित टोल संकलन प्रणाली लागू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे भारत आधुनिक, जलद, आणि तंत्रज्ञानाधिष्ठित रस्ते प्रवासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकणार आहे.



नवीन टोल प्रणाली ही ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टम (GNSS) वर आधारित आहे. या तंत्रज्ञानाद्वारे वाहनांमध्ये बसवण्यात येणाऱ्या ऑन-बोर्ड युनिट (OBU) च्या माध्यमातून वाहनाचा प्रवास केलेला खरा अंतर सॅटेलाइटद्वारे मोजला जाईल. यावर आधारित टोल आकारणी केली जाईल, आणि वाहनचालकांना कुठल्याही टोल नाक्यावर थांबावे लागणार नाही. या प्रणालीमध्ये बँक खाते किंवा डिजिटल वॉलेटशी लिंक केलेले जइण युनिट वाहनामध्ये बसवले जाईल, जे वाहनाचा मार्ग ट्रॅक करेल आणि योग्य रक्कम आपोआप वजा करेल.

फास्टॅग प्रणाली जरी सुरुवातीला यशस्वी ठरली असली, तरी काही तांत्रिक बिघाड, गैरवापर, आणि गर्दीमुळे समस्या निर्माण झाल्या. या सर्व त्रुटी दूर करण्यासाठी सरकारने GNSS प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे टोल संकलन अधिक पारदर्शक, अचूक आणि विनातक्रारी होईल.या नवीन प्रणालीचे अनेक फायदे आहेत. वाहनचालकांना टोल नाक्यावर थांबावे लागणार नाही, ज्यामुळे वेळ आणि इंधन दोन्हीची मोठी बचत होईल. तसेच, खऱ्या अंतरावर आधारित अचूक टोल आकारणी होईल, आणि वाहतूक कोंडी कमी होईल. डिजिटल वॉलेट किंवा बँक खात्यातून स्वयंचलित पेमेंट होईल, ज्यामुळे व्यवहार अधिक सुलभ होतील.

१ मे २०२५ पासून काही निवडक राष्ट्रीय महामार्गांवर GNSS प्रणाली सुरू होईल, आणि त्यानंतर हळूहळू सर्व महामार्गांवर हे लागू होईल. ३० एप्रिल २०२५ पर्यंत फास्टॅग वापर चालू राहील, परंतु काही काळासाठी हायब्रिड मोड ठेवला जाईल, ज्यामध्ये काही लेनमध्ये फास्टॅग आणि काही लेनमध्ये GNSS प्रणाली लागू केली जाईल.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूरमधील एका कार्यक्रमात सांगितले, आम्ही सॅटेलाइट टोल प्रणाली सुरू करत आहोत. येत्या १५ दिवसांत नवीन टोल धोरण लागू होईल. टोल प्लाझावर थांबण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे लोकांना मोठा दिलासा मिळणार आहे.या प्रणालीमुळे भारतात स्मार्ट रस्ते आणि शून्य अडथळ्यांचा प्रवास सुरू होईल. भविष्यातील डिजिटल परिवर्तनाला गती मिळवून देशाची वाहतूक व्यवस्था अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम होईल. १ मे २०२५ पासून टोल संकलन प्रणालीचे नवे युग सुरू होणार आहे, आणि वाहनचालकांना यासाठी जइण बसवण्यासाठी सज्ज व्हायला सांगण्यात आले आहे.

# सुजित झावरे यांचा विकास कामांसाठी नेहमीच पाठपुरावा-मा.खा.सुजय विखे

### पारनेर तालुक्यातील वासुंदे येथे भव्य बैलगाडा शर्यत आणि विकासकामांचे लोकार्पण

**पारनेर । प्रतिनिधी**

पारनेर तालुक्यात सत्ता नसतानाही सुजित झावरे यांनी विकासाच्या बाबतीत नेहमीच पाठपुरावा केला आहे, असे माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी वासुंदे येथील एका कार्यक्रमात सांगितले. वासुंदे येथील श्री बिरोबा यात्रा उत्सवानिमित्त सुजित झावरे पाटील आणि देवकृपा फाउंडेशनच्या वतीने भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या शर्यतीत संगमनेर, जुन्नर, शिरूर, आंबेगाव आणि नगर या भागांतील स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला.



यावेळी माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत, वासुंदे येथील बिरोबा मंदिरासाठी सभामंडप आणि गावातील इतर विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. त्यांचं म्हणणं होतं की, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून या विकासकामांमध्ये कोणतीही कमतरता राहणार नाही. त्यांच्याद्वारे प्रगतीच्या मार्गावर वासुंदे गाव आणि तालुका नेहमीच असेच पुढे जाईल.

या कार्यक्रमाला विविध मान्यवर उपस्थित होते. त्यात अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, गुरुदत्त पतसंस्थेचे चेअरमन बा. ठ. झावरे, युवक तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, माजी सभापती अरुणराव ठाणगे, माजी पंचायत समिती सदस्य अमोल साळवे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी रोकडे, राष्ट्रवादी महिला जिल्हा उपाध्यक्ष सुधामती कवाद, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष सुषमा रावडे, ॲड. बाबासाहेब खिलारी, उपसरपंच शंकर बर्वे, शंकर महांडुळे, सतीश पिंपरकर, रवींद्र पडळकर, स्वप्निल राहींज, विठ्ठल कवाद, दिलीप पाटोळे, बाळासाहेब झावरे, गजानन झावरे, बाळशीराम पायमोडे, स्वप्निल झावरे, इंजि. प्रसाद झावरे, सचिन सैद, इंजि. निकिल दाते, तुकाराम झावरे, दत्तात्रय काळणर, बाळासाहेब साळुंके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमामुळे गावातील उत्साह वाढला आहे. सुजित झावरे यांच्या नेतृत्वाखाली वासुंदे गावाला नवी दिशा मिळाली आहे. कार्यक्रमातील बैलगाडा शर्यतीमुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आणि विकासकामांची गती देखील वाढली. उपस्थितांनी असा विश्वास व्यक्त केला की, अशा उपक्रमांमुळे तालुक्याच्या विकासाला आणखी गती मिळेल.

# शेतकऱ्याच्या लेकीची अफलातून झेप!

### बोंड गावच्या पल्लवी राऊतची महाराष्ट्र राज्य सेवा महिला अधिकारीपदी निवड



**तळोधी (बा.) । प्रणय बांगरे**

नागभिड तालुक्यातील बोंड गावाच्या कु. पल्लवी जगदिश राऊत हिने महाराष्ट्र राज्य सेवा महिला अधिकारी (लीपीक) या पदावर यशस्वी निवड होऊन आपल्या कुटुंबाचे, गावाचे आणि तालुक्याचे नाव उज्वल केले आहे. तिची ही निवड वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या माध्यमातून झाली आहे. पल्लवी ही बोंड गावातील पहिली महिला अधिकारी ठरली असून तिच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे आणि कौतुकाचे वातावरण आहे.

पल्लवीचे वडील जगदिश राऊत हे स्वतः शेतकरी असून सध्या ग्रामपंचायत बोंडचे उपसरपंच आहेत. पल्लवी कुटुंबातील धाकटी असून तिच्या दोन बहिणींचे विवाह झाले आहेत. घरच्या गरिबीतून, शेतातल्या कष्टातून आणि सीमित साधनांतून पल्लवीने आपले शिक्षण पूर्ण केले. अनेक वर्षांच्या प्रचंड बौद्धिक परिश्रमानंतर तिने ही घवघवीत कामगिरी केली आहे.गावातील हनुमान मंदिराच्या प्रांगणात स्वप्नपूर्ती मंडळाच्या वतीने पल्लवीचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी गावकऱ्यांनी तिच्यावर पुष्पवृष्टी करत तिच्या कर्तृत्वाला सलाम केला.या यशाबद्दल बोलताना पल्लवीचे वडील म्हणाले, हे यश केवळ आमच्या लेकीचं नाही, तर आमचं स्वप्न पूर्ण झाल्यासारखं वाटतं. पल्लवीला तिच्या जीजुंची साथही खूप मोलाची ठरली.स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील एका सामान्य कुटुंबातील मुलीने केलेली ही घोडदौड अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. तिच्या यशाने दाखवून दिलं आहे की, जिद्द, चिकाटी आणि सततचा अभ्यास यांच्या जोरावर कोणतीही शिखरं गाठता येऊ शकतात.

# १९ एप्रिलला मोफत कर्करोग तपासणी, उपचार व रक्तदान शिबीर

### आ.डॉ.देशमुख यांच्या सौजन्याने आरोग्य जनजागृतीचा उपक्रम

**कळमेश्वर । प्रतिनिधी**

कर्करोगमुक्त समाजासाठी कार्यरत असलेले आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या सौजन्याने भव्य कर्करोग निदान व उपचार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर शनिवार, दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत ग्रामीण रुग्णालय, कळमेश्वर येथे होणार आहे.

या शिबिरात तंबाखू, गुटखा, धूम्रपानाचे व्यसन असलेल्या व्यक्तींना तसेच तोंडात लाल-पांढरे चट्टे, तोंड उघडण्यास त्रास, स्तनातील गाठ, ओटीपोटातील दुखणे, अनियमित पाळी, श्वेतप्रदर आदी लक्षणे असलेल्या नागरिकांची मोफत तपासणी करण्यात येईल.

शिबिरात केवळ कर्करोग नव्हे, तर इतर आजारांवरही तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी आणि नोंदणी केल्यानंतर पुढील उपचारासाठी नागपूर येथील रणजीत देशमुख दंत महाविद्यालय, लता मंगेशकर हॉस्पिटल व सरकारी वैद्यकीय रुग्णालयात रेफर केले जाणार आहे.या शिबिरात तरुणांनीही मोठ्या संख्येने रक्तदान करून समाजासाठी योगदान द्यावे, असे आवाहन आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .